मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ वर दि.०९.०९.२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६-ब
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ नोव्हेंबर, २०२०

**प्रस्तावना -:**

महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाची आणि राज्यातील नियंत्रणा खालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदरील याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या उपरोक्त अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत महाधिवक्ता,महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले कायदेशिर अभिप्राय विचारात घेऊन योग्य त्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यानुसार शासन पुढील प्रमाणे सुचना देत आहे

**शासन निर्णय :-**

- मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका यामध्ये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून संबंधित प्रशासकीय विभागांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.०९.०९.२०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडावी. ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ९ सप्टेंबर

२०२० पूर्वी एईसीबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील परंतु त्यांना प्रवेश देण्यात आले नसतील अशा एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावे.

३. वरील सुचना या मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील निर्णयाच्या तसेच राज्य शासनाने या कामी देण्यात आलेली अंतरीम स्थगिती उठविण्याकरीता दाखल केलेल्या अर्जाच्या निर्णयाच्या अधीन राहतील.

४. हा शासन निर्णय अंतरिम स्थगिती उठविण्याच्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत लागू राहील.

५. वरील निर्णयांची अंमलबजावणी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी तात्काळ करावी व संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे सादर करावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक — असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. २०२०११२०१९४९४६१८०७

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. अं. खडसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

---

पृष्ठांकन पत्र क्र.विकाऔ/शिक्षण/२०२०/ २९६८

दिनांक : 25 NOV 2020

प्रत : सर्व प्राचार्य, सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका/पदवी/पद्व्युत्तर पदवी संस्था,औरंगाबाद विभाग यांना देऊन कळविण्यांत येते की, उपरोक्त शासन निर्णयात दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

**( महेश शिवणकर )**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.